**म. सं. कौ. हिं. का. अर्ज क्र.६/२०२३ निशाणी ५ खालील आदेश.**

(वृषाली मस्तुद व १ वि. नागेश मस्तुद व इतर.)

प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार यांनी घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ कलम २३ नुसार जाबदेणार क्र.१ यांचेकडून अंतरीम पोटगी रक्कम दरमहा रुपये २५,०००/– मिळावे असा आदेश व्हावा यासाठी दाखल केला आहे.

**अर्जदाराचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः–**

२. अर्जदाराच्या अर्जातील कथनाप्रमाणे अर्जदार व जाबदेणार क्र.१ यांचा विवाह दि.०८/०६/२०१९ रोजी झाला आहे. अर्जदाराने प्रस्तुतचे प्रकरण हे महिलांचा घरगुती हिंसाचारापासून संरक्षण अधिनियमाखाली दाखल केलेला आहे. अर्जदार हीस प्रत्येक तारखेस न्यायालयात हजर राहावे लागते. अर्जदाराची परिस्थिती हलाखीची आहे. अर्जदारास स्वतंत्र उत्पन्न नाही. अर्जदार हे स्वतःचा व अर्जदार क्र.२ चा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. याउलट जाबदेणार यांचेकडे केडगांव, ता.करमाळा, जि.सोलापूर येथे ५ ते ६ एकर बागायत जमीन असून शेतीपासून वर्षाकाठी खर्च वजा जाता १० ते १५ लाख रूपये उत्पन्न मिळते. तसेच मुंबई कांजुर मार्ग भांडुप येथे स्वतःचे चार खोल्याचे घर असुन त्यातील काही खोल्या भाडयाने दिल्या आहेत. त्यापासून १५ हजार रूपये महिन्याला मिळतात. जाबदेणार क्र.१ हा एम. बी. ए. उच्चशिक्षीत असून मुंबई येथे नामांकित कंपनीत नोकरीस असून त्याला दरमहा ७० हजार रूपये पगार मिळतो. जाबदेणाराचे आर्थीक परिस्थीतीवरुन जाबदेणार हा अर्जदार व तिच्या मुलाच्या चरितार्थाकरीता दरमहा पोटगी देण्यास समर्थ आहे. करीता, अर्जदार हिने जाबदेणाराकडून दरमहा रक्कम रुपये २५,०००/– अंतरीम पोटगी देण्याचा आदेश होण्याची विनंती केली आहे.

३. जाबदेणार यांनी निशाणी क्र.१७ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविला आहे. अर्जदाराने अर्जदाराचा मुळ अर्ज व अंतरीम पोटगीच्या अर्जातील सर्व कथने नाकारली आहेत. जाबदेणाराच्या म्हणण्यातील कथनानुसार त्याने अर्जदाराच्या मुळ अर्जात केलेल्या आरोपाप्रमाणे कोणताही कौटुंबीक हिंसाचार केलेला नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अंतरीम पोटगीचा अर्ज चालु शकत नाही. जाबदेणाराने त्याच्या म्हणण्यात पुढे

अर्जदार ही जाबदेणारासह राहत असताना अर्जदाराने जाबदेणारास दिलेल्या मानसिक त्रासाबाबत कथने केली आहेत. अर्जदार ही जाबदेणार यांच्या संमतीविना माहेरी आली आहे. अर्जदार कोणत्याही संयुक्तीक कारणाशिवाय स्वतःच्या इच्छेने माहेरी राहत आहे. जाबदेणाराने वैवाहिक नातेसंबंध सुरळीत ठेवण्यासाठी खूप प्रयत्न केलेले आहेत.

४. जाबदेणाराचे मते, जाबदेणार यास कायमस्वरूपी चांगली भरघोस उत्पन्न देणारी नोकरी मिळाली नाही. जाबदेणारावर त्याच्या आईवडीलांचा खर्च आहे. जाबदेणार हा स्वतःचा चरितार्थ कसाबसा चालवत आहे. जाबदेणाराला शेतीपासून कोणतेही उत्पन्न मिळत नाही. अर्जास कोणतेही संयुक्तीक कारण घडलेले नाही. जाबदेणार यांनी नांदण्यास येण्यासाठी कौटूंबिक न्यायालय, बांद्रा येथे पिटीशन नं.९२३/२०२३ दाखल केलेले आहे. ते प्रलंबित आहे. अर्जदार ही खाजगी कंपनीत नोकरी करते. तिला पोटगीची कोणतीही आवश्यकता नाही. त्यामुळे सदर अर्ज नामंजूर करण्याची विनंती जाबदेणार यांचेतर्फे करण्यात आली.

५. अर्जामधील कथने, जाबदेणाराचे अर्जास म्हणणे तसेच अभिलेखावर दाखल प्रथमदर्शनी पुरावा व अर्जदार व जाबदेणारांचे वकिलांचा युक्तिवाद यांचा विचार करता, सदर अर्जाच्या निकालासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दयांवरील निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे दिले आहेत.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार हे जाबदेणाराकडून अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहेत काय ? असल्यास अंतरीम पोटगीची रक्कम किती ? | होय. दरमहा एकत्रित र. रु. ५,०००/– |
| २ | आदेश काय ? | अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो. |

–: **कारणमिमांसा:–**

६. अर्जदारातर्फे विद्वान वकिल श्री.ए. एस. धारूरकर व जाबदेणारतर्फे विद्वान वकिल श्री.एस.एम.देशपांडे यांनी केलेला युक्तीवाद ऐकला.

७. उभयपक्षकारांनी त्यांच्यातील लग्नसंबंध कबुल केलेले आहेत. अर्जातील

कथनावरुन अर्जदार व जाबदेणार क्र.१ यांनी एकत्रित सहजीवन व्यतिथ केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. त्यामुळे अर्जासाठी आवश्यक असणारे घरगुती नातेसंबंध अर्जदार व जाबदेणार यांच्या दरम्यान अस्तित्वात असल्याचे स्पष्ट होते.

**<u>मुद्दा क्र. १ व २ बाबतः–</u>**

८. कौटुंबीक हिंसाचारापासुन स्त्रीयांचे संरक्षण कायदा, कलम २३ नुसार अंतरीम पोटगीचा अर्ज निकाली करते समयी अर्जदारास ती जाबदेणार यांचेपासुन कौटुंबीक हिंसाचाराने पिडीत असल्याचे प्रथमदर्शनी शाबीत करणे गरजेचे आहे. प्रस्तुतचा अर्ज निकाली करते समयी उभय पक्षकारांनी त्यांची केस पुर्णतः शाबीत केली आहे किंवा नाही हे पाहणे गरजेचे नाही. सदर कायद्यातील परिस्थीतीस अनुसरुन प्रस्तुत प्रकरणाचा अभिलेख पाहीला असता अर्जदार व जाबदेणार क्र.१ यांनी एकमेकांविरुध्द कौटुंबीक हिंसाचाराची कथने केली आहेत.

९. अर्जदार हिने तीच्या शपथपत्रात जाबदेणार यांनी केलेल्या कौटुंबीक हिंसाचारामुळे ती तीच्या मुलासह माहेरी राहत असल्याचे कथन केले आहे. तर जाबदेणार क्र.१ ने त्याच्या म्हणण्यामध्ये अर्जदार ही तीच्या इच्छेने कोणत्याही संयुक्तीक कारणाशिवाय विनाकारण माहेरी राहत असल्याचे कथन केले आहे. सदर अर्जदाराने तीच्या प्रस्तुतच्या अर्जामध्ये जाबदेणार यांनी केलेल्या त्रासाबद्दल स्पष्ट असे कथन केलेले आहे. तसेच अर्जदारांचे व तीच्या मुलाचे पालन पोषण करण्याची जाबदेणार क्र.१ याची आहे. तसेच अर्जदार यांनी नि.क्र.२४ सोबत दाखल केलेल्या अर्जदार क्र.२ श्रीअंश याचा शैक्षणिक व दवाखान्याचे खर्चाबाबत पावत्या दाखल केलेल्या आहेत. सदर पावत्यावरून असे दिसून येते की, अर्जदार क्र.२ साठी अर्जदार क्र.१ हिला शैक्षणिक व दवाखान्याचा खर्च करावा लागतो. परंतु, जाबदेणाराने अर्जदार ही तीच्या मुलासह माहेरी राहत असल्यापासुन अर्जदार व तीच्या मुलाचे पालन पोषण करण्याकरीता कोणतीही व्यवस्था केल्याचे दिसून येत नाही. तसेच तशी व्यवस्था केल्याबाबत जाबदेणार क्र.१ याने कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. सदरची बाब ही देखील जाबदेणार क्र.१ याने अर्जदार यांचे उदर निर्वाहाची व्यवस्था न केल्याने कौटुंबीक हिंसेत गणली जाते. त्यामुळे प्रथमदर्शनी जाबदेणार यांनी अर्जदार हिच्यावर कौंटुंबीक हिंसाचार केला असे प्रथमदर्शनी दिसुन येते.

**१०.** प्रस्तुत प्रकरणात अर्जदार हिने तिच्या अर्जातील कथनाला पुष्टी देण्यासाठी कौटूंबिक घटना अहवाल दाखल केलेला आहे. तसेच एन. सी. ची प्रत दाखल केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणातील कौंटुबीक घटना अहवाल हा प्रथमदर्शनी अर्जदाराच्या कथनाला पुष्टी देतो. तसेच अर्जदाराने जाबदेणार यांचेविरुध्द एन. सी. आर. नं.२७२/२०२३ दाखल केल्याचे दिसून येते. प्रथमदर्शनी अर्जदाराच्या कथनाला पुष्टी मिळते.

**११.** अर्जदार ही तीच्या मुलासह वेगळी राहत आहे व वेगळी राहत असल्यापासुन जाबदेणार क्र.१ याने अर्जदाराच्या व तीच्या मुलाच्या दैनंदीन निर्वाहाबाबत नियमीतपणे व्यवस्था केलेली नाही. सदरील बाबी ह्या प्रस्तुतचा अर्ज निकाली करते समयी जाबदेणार क्र.१ ने अर्जदाराचा कौटुंबीक हिंसाचार केला हे प्रथमदर्शनी शाबीत करण्याकरीता पुरेशा आहेत. करीता, जाबदेणार यांनी अर्जदार हिचा कौटुंबीक हिंसाचार केला असुन अर्जदार ही कौटुंबीक हिंसाचाराने पिडीत आहे ही बाब प्रथमदर्शनी पुराव्यावरुन प्रस्तुतचा पोटगी अर्ज निकाली करते समयी शाबीत होते.

**१२.** अर्जदाराने प्रथमदर्शनी जाबदेणाराकडून होणारा कौटुंबीक हिंसाचार शाबीत केला आहे. अर्जदार ही तीच्या मुलासह जाबदेणारपासुन माहेरी वेगळी राहत आहे. अर्जदार व तीच्या मुलाच्या उदरनिर्वाहाची व राहण्याची व्यवस्था करणे ही जाबदेणार क्र.१ याची नैतीक व कायदेशीर जबाबदारी आहे. परंतु जाबदेणार क्र.१ याने तशी कोणतीही व्यवस्था केलेली नाही. अशा परिस्थीतीत अर्जदार जाबदेणार क्र.१ कडून तीचे व तीच्या मुलाच्या दैनंदीन उदरनिर्वाहासाठी दरम्यानची पोटगी मिळण्यास पात्र आहे.

**१३.** दरम्यानच्या पोटगीची रक्कम ठरविते वेळी अर्जदार व जाबदेणार क्र.१ यांनी एकमेकांच्या आर्थिक परिस्थीतीबाबत अभिलेखावर केलेली कथने पाहीली असता, अर्जदार हिने जाबदेणार यांना केडगांव येथे ५ ते ६ एकर बागायत जमीन असून त्यापासून १० ते १५ लाख रूपये खर्च वजा जाता उत्पन्न मिळते. तसेच मुंबई कांजुर मार्ग भांडूप येथे भाडयाच्या खोल्याच्या माध्यमातून १५ हजार रूपये उत्पन्न मिळते तसेच मुंबई येथे नामांकित कंपनीत नोकरीस असून दरमहा ७० हजार रूपये पगार मिळतो असे कथन केले आहे. जाबदेणार यांनी त्याला दरमहा ५० हजार रूपये उत्पन्न मिळते ही गोष्ट मान्य केलेली आहे. जाबदेणाराने दाखल केलेल्या नि.क्र.२६ सोबतच्या पगार पावतीवरून

जाबदेणाराला रू.५१,०१७/– रूपये उत्पन्न मिळते असे दिसून येते. त्यामुळे जाबदेणाराकडे उत्पन्नाचे साधन आहे हे स्पष्ट होते. याउलट अर्जदाराकडे उत्पन्न स्त्रोत आहे असे दाखविणारा पुरावा जाबदेणाराने दाखल केलेला नाही.

**१४.** एकंदरीत, अर्जदार व जाबदेणार क्र.१ यांचे परिस्थीतीबाबत वरील विवेचनावरुन आणि सध्याची सामाजिक परिस्थीती पाहता जाबदेणार क्र.१ याने अर्जदार व तीच्या मुलाच्या शैक्षणिक, दैनंदीन खर्चासाठी, उदरनिर्वाहासाठी करीता दरमहा एकत्रित रक्कम रुपये ५,०००/– रुपये अंतरीम पोटगी देण्याचा आदेश करणे योग्य व रास्त वाटते. करीता, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र.२ च्या उत्तरार्थ खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. जाबदेणार क्र.१ याने अर्जदार क्र.१ व २ यांना अंतरीम पोटगी म्हणून दरमहा एकत्रित रक्कम रुपये ५,०००/– मुळ अर्ज दाखल तारखेपासुन मुळ अर्जाचा अंतीम निकाल होईपर्यंत द्यावेत.

३. प्रस्तुत आदेशाची प्रत उभय पक्षकारांना मोफत देण्यात यावी.

PATIL ATUL BHIMRAO
Digitally signed by PATIL ATUL BHIMRAO
Date: 2025.02.07 15:02:47 +0530

**( ए. बी. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**दि.०४/०२/२०२५**

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | उमेश वाय.भगत |
| न्यायालयाचे नाव | श्री. ए. बी. पाटील , ३ रे सह दिवाणी न्यायाधीश तथा न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर. |
| न्यायनिर्णयाची तारिख | **०४/०२/२०२५** |
| न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | **०४/०२/२०२५** |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | **०७/०२/२०२५** |